**६६८२१**
**आर बी आय/२००५-०६/१८१**
**संदर्भ : डि पी पी एस (सी ओ) सं.५९०/०१.०१.१५/२००५**

ऑक्टोबर १७,२००५

प्रति,
अध्यक्ष/मुख्य कार्यापालक अधिकारी
इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवांमध्ये
भाग घेणाऱ्या सर्व बँका

प्रिय महोदय,

**इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा (इ सी एस)**

जसे की आपण जाणत असाल, शासकीय खाती/कंपनी निकाय यांसारखे उपयोग कर्त्यांचा त्यांच्या पगार, पेन्शन, लाभांश, व्याज इ. सारख्या वारंवार करावयाच्या भरण्यासाठी होत असलेल्या इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवेचा वापर वाढतच जात आहे.

२. इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा ही उपयोगकर्ता व लाभधारक ग्राहक दोघांनाही खूप सोयीची झाली आहे. परंतु तक्रारींच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. मुख्य तक्रार अशी आहे की इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवेच्या नोंदी करताना, बँका पास बुकात /हिशेबाच्या विवरणपत्रांत दिलेले तपशील हे अपूर्ण असतात आणि ह्यामुळे ग्राहकांना व्यवहाराचा (देवघेवीचा) समेट करणे अवघड होते. सार्वजनिक सेवांची प्रक्रिया आणि कार्य निष्पादन लेखा परिक्षा संबंधी समितीने विवरण पत्रात व्यवहारांचा पूर्ण तपशील देण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे.

३. आम्ही असेही नमूद करतो की इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवेच्या अहवालामध्ये (पेपर आणि इलेक्ट्रॉनिक) विवरणपत्रात पूर्ण तपशील देणे सूकर होण्यासाठी ग्राहकाचे नाव संक्षेप रुपात दिलेले असते. हे संक्षेप रुप योग्य तऱ्हेने शोधून वापरात आणावे.

४. वरील सूचना लक्षात घेऊन इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवेमधून दिलेल्या जमेच्या संदर्भात आवश्यक ते तपशील ग्राहकांच्या पासबुकात/विवरण पत्रात देण्यासाठी योग्य ते अनुदेश आपल्या शाखांना द्यावेत. हे सुकर करण्यासाठी योग्य तो तंत्रज्ञान असलेला मार्ग स्वीकारावा.

५. इ एफ टी, एस ई एफ टी, आर टी जीस सारख्या इतर इलेक्ट्रॉनिक पेमेंट (भरणा) च्या विविध, प्रकारांसाठी प्रेषक/वित्तप्रेषणचे तपशील मिळवण्यासाठी समान दृष्टीकोन ठेवावा.

आपला विश्वासू

हस्ताक्षर
(काझा सुधाकर)
महा व्यवस्थापक